# राष्ट्रीय आयुर्वेद दिनी 'रन फॉर आयुर्वेद'

## एसबीजी आयुर्वेद कॉलेजचा पुढाकार



**विजयकुमार हिरेमठ ध्वज दाखवून रनचा शुभारंभ करताना.**

**बेळगाव :** राष्ट्रीय आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने एसबीजी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजच्या पुढाकाराने तसेच केएलई बी. एम. कंकणवाडी आयुर्वेदिक कॉलेज व डॉ. रवी पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी 'आयुर्ज्योती यात्रेचे' अर्थात 'रन फॉर आयुर्वेद'चे आयोजन करण्यात आले होते. कॅम्प येथून या रनला प्रारंभ झाला. अबकारी खात्याचे निवृत्त पोलीस अधिकारी विजयकुमार हिरेमठ यांच्या हस्ते ध्वज दाखवून रनला प्रारंभ झाला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सुहासकुमार शेट्टी, डॉ. किरण खोत, डॉ. अविवेश अरकेरी व अन्य डॉक्टर विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी डॉ. सुहासकुमार यांनी आयुर्वेदाचे महत्त्व अधोरेखित केले. कॅम्प पोलीस स्थानक, संचयनी सर्कल ते चन्नम्मा सर्कल या मार्गे ही रन निघाली. रनमध्ये आयुर्वेदाचे महत्त्व सांगणारे फलक हाती धरण्यात आले होते.